नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १४९ Issue - 149 | वार शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २०२५ Blow- Friday Date 17 October 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आवश्यक मनुष्यबळाची उपलब्धता करावी

## राज्य निवडणूक आयुक्त वाघमारे यांनी सरकारला दिले निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची आवश्यकता असून, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ते प्राधान्याने उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तयारीसंदर्भात आयोगाच्या कार्यालयात दिनेश वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते.




मुख्य सचिव राजेश कुमार, आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंदराज, वित्त विभागाचे प्रधान सचिव सौरव विजय, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, गृहविभागाचे प्रधान सचिव अनुपकुमार सिंग, मुंबईचे पोलिस आयुक्त देवेन भारती, विशेष पोलिस महानिरीक्षक मनोजकुमार शर्मा, आदी यावेळी उपस्थित होते.

दिनेश वाघमारे यांनी सांगितले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी आणि इतरही कर्मचाऱ्यांची उपलब्धता महत्वाची आहे. त्याचबरोबर राज्य निवडणूक आयोगातही काही जागा रिक्त आहेत. एकूण मनुष्यबळाच्या उपलब्धतेबाबत संबंधित विभागांना अवगत करण्यात यावे.

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. गरजेनुसार भरारी पथके, चेकपोस्ट, तक्रार निवारण केंद्र इत्यादींची व्यवस्था करावी. सर्व ठिकाणी पुरेसा पोलीस बंदोबस्त असावा. आचारसंहितेच्या प्रभावी अंमबजावणीच्या दृष्टीने संपूर्ण यंत्रणेने सजग राहणे आवश्यक आहे. कुठेही अनुचित प्रकार घडणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी, असेही वाघमारे यांनी सांगितले.

मुख्य सचिव राजेश कुमार यांनी सांगितले की, राज्य निवडणूक आयोगाला निवडणुकांसाठी आवश्यक ते मनुष्यबळ उपलब्ध करून दिले जाईल. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची पुरेशी उपलब्धता होण्याच्या दृष्टीने आतापासूनच नियोजन केले जाईल. कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीनेही आवश्यक ती खबरदारी घेतली जाईल.

आयोगाचे सचिव काकाणी यांनी निवडणुकांच्यादृष्टीने आवश्यक बाबींसदर्भात माहिती दिली. ते म्हणाले की, राज्यातील सर्व २९ महानगरपालिका, २४६ नगरपरिषदा, ४२ नगरपंचायती, ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्यांच्या निवडणुकांची तयारी सुरू आहे. प्रभाग रचनेचे काम पूर्ण झाले आहे. आरक्षण निश्चिती आणि मतदार यादीचा कार्यक्रम देण्यात आला आहे. निवडणुकांच्या अनुषंगाने विविध आदेशही निर्गमित करण्यात आले आहेत.

# पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्याला पावसाचा अलर्ट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील वातावरणात सातत्यानं बदल होत आहे. कुठे पाऊस तर कुठं उघडीप झाल्याचं चित्र दिसत आहे. आज देखील राज्याच्या काही भागात जोरदार पाऊस झाल्याचं चित्र पाहायला मिळालं. दरम्यान, उद्या हवामान कसं असेल? राज्यात पावसाची शक्यता आहे का? याबाबतची माहिती हवामान विभागानं दिली आहे. जाणून घेऊयात सविस्तर माहिती.

विभागानं दिलेल्या माहितीनुसार, तापमानात किंचित वाढ होत असून अनेक भागांत ढगाळ वातावरणासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.१७ ऑक्टोबर रोजी कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा तसेच उत्तर महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह हलक्या पावसाची शक्यता आहे. तर विदर्भात मात्र कोरडे वातावरण राहण्याचा अंदाज आहे. मुंबईत कमाल तापमान ३६ अंश सेल्सिअस आणि किमान २६ अंश सेल्सिअस इतके राहण्याची शक्यता आहे. मुंबई, पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांत ढगांच्या गडगडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. त्यामुळं नागरिकांनी सावधानता बाळगावी असं आवाहन करण्यात आलं आहे.

विभागानं दिलेल्या माहितीनुसार, पुण्यातील कमाल तापमान ३३ अंश सेल्सिअस आणि किमान तापमान २० अंश सेल्सिअस इतके राहण्याची शक्यता आहे. पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली आणि सोलापूर या जिल्ह्यांत हलक्या पावसाची शक्यता आहे. तसेच घाटमाथा परिसरात देखील विजांच्या कडकडाटासह हलक्या पावसाची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे. मराठवाड्यातही उद्या पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये कमाल तापमान ३२ अंश सेल्सिअस आणि किमान तापमान २२ अंश सेल्सिअस इतके राहण्याचा अंदाज आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांत ढगांच्या गडगडाटासह हलक्या पावसाची शक्यता आहे.

उत्तर महाराष्ट्रातील नाशिकमध्ये कमाल तापमान ३३ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २१ अंश सेल्सिअस इतके राहण्याचा अंदाज आहे. धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांत हलक्या पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

विदर्भातील नागपूरमध्ये कमाल तापमान ३३ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २३ अंश सेल्सिअस इतके राहण्याची शक्यता आहे. अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ या जिल्ह्यांत कोरडे वातावरण राहण्याची असल्याचं हवामान विभागानं सांगितलंय. राज्यातील काही भागांत पावसाचे सत्र सुरू राहण्याची चिन्हे आहेत. पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि मराठवाडा येथे विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असून विदर्भात कोरडे हवामान राहणार असल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे. तसेच तापमानात वाढ होत असल्याने उकाड्याची तीव्रता थोडी वाढण्याची शक्यता आहे.

# ऐन दिवाळीत एसटी आरक्षण प्रणाली ठप्प

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ऐन दिवाळीच्या तोंडावर एसटीने गावी जाणाऱ्या प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचं दिसून येतंय. एसटी आरक्षण प्रणाली ठप्प झाल्याने प्रवास कसा करायचा असा प्रश्न आता पडला आहे. आरक्षण प्रणाली ठप्प झाल्याचा फटका प्रवाशांसह एसटी महामंडळालाही बसत असल्याचं चित्र आहे. तसेच नवीन प्रणालीमुळे कर्मचारीही वैतागले आहेत.



एसटी आरक्षण प्रणाली सॉफ्टवेअर आणि कंपनीमध्ये दोन वर्षाआधी महामंडळाने बदल केला आहे. त्या माध्यमातून जुन्या आरक्षण प्रणालीच्या जागी नवीन आरक्षण प्रणाली आणली. पण सदर प्रणाली ही सोयीस्कर होण्याऐवजी जास्तच किचकट होत असल्याचं चित्र आहे. ऐन दिवाळीच्या मोक्यावरती आरक्षण प्रणाली पूर्ण बंद पडली असून प्रवाशांना नाहक त्रास होत आहे.

कर्मचाऱ्यांना मेमो देणे, मशीन इश्यु करणे या साठी आधी एका गाडीसाठी आरक्षण मेमो प्रिंट काढतांना एक कागद लागत होता. आता एकाच मेमोची प्रिंट घेण्यासाठी तीन कागद लागतात. त्यामुळे महामंडळाचा खर्चही वाढल्याचं दिसून येतंय.

काही कर्मचाऱ्यांनी नाव न सांगण्याच्या अटीवरती सांगितले की, आधीची आरक्षण प्रणाली ही खूप छान आणि सोयीस्कर होती. पण आता जी आरक्षण प्रणाली आहे ती अतिशय अवघड आणि खूप किचकट करण्यात आली आहे. त्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांना सुद्धा या आरक्षण प्रणाली वर काम करताना खूप त्रास होत आहे.

राज्य सरकारकडून एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांसाठी हात खुला करण्यात आला. राज्य सरकारकडून ४८ हफ्त्यांमध्ये कर्मचाऱ्यांची २२०० कोटी रुपयांची रक्कम देण्यास मंजुरी देण्यात आली.

यंदा दिवाळीनिमित्ताने एसटी कर्मचाऱ्यांना ६ हजार रुपये सानुग्रह अनुदान म्हणजे बोनस देण्यात येणार आहे. त्याचसोबत १२ हजार रुपयांच्या उचलसंदर्भात देखील घोषणा करण्यात आली.

राज्य मार्ग परिवहन महामंडळाने दिवाळीच्या आधी 'आवडेल तिथे प्रवास' योजनेच्या पासमध्ये कपात करून प्रवाशांना खुशखबर दिली आहे. एकूण २० ते २५ टक्के कपात केल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

'आवडेल तिथे प्रवास' या योजनेअंतर्गत प्रवाशांना एकाच पासवर राज्यातील कुठेही अमर्याद प्रवास करण्याची सुविधा मिळते. या योजनेत प्रवाशांना एकाच पासवर राज्यातील कोणत्याही एसटी बसने अमर्याद प्रवास करण्याची मुभा मिळते. एसटीचा चार किंवा सात दिवसांचा पास घेतल्यावर प्रवाशांना दरवेळी तिकीट काढण्याची आवश्यकता नसते.

# गुजरातमध्ये मुख्यमंत्री सोडून सर्वच्या सर्व मंत्र्यांचा राजीनामा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दिल्ली : दिवाळीच्या अगदी तोंडावर गुजरात मंत्रिमंडळात फेरबदल होणार आहेत. मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल सोडून सर्वच मंत्र्यांनी राजीनामा दिल्याने खळबळ उडाली आहे. सर्व मंत्र्यांनी मुख्यंत्र्यांकडे राजीनामे सोपवले आहेत. भूपेंद्र पटेलांच्या निवासस्थानी अत्यंत महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीनंतर सर्व मंत्र्यांनी राजीनामे सोपवले. राजीनाम्यापूर्वी मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्यासोबत बैठक झाली. या बैठकीनंतर राजीनामे स्वीकारले गेले. दरम्यान, आता सर्व राजीनामे राज्यपालांकडे सोपवले जातील. महत्त्वाचं म्हणजे सर्व मंत्र्यांचे राजीनामे खिशात होते, या राजीनामापत्रांवर सह्याही होत्या. मुख्यमंत्र्यांसोबत बैठक झाल्यानंतर सर्व मंत्र्यांनी खिशातून राजीनामे बाहेर काढले. नवीन मंत्र्यांचा शपथविधी उद्याच १७ ऑक्टोबर रोजी अमित शाह आणि भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांच्या उपस्थितीत होईल. सध्याच्या गुजरात मंत्रिमंडळात मुख्यमंत्री पटेल यांच्यासह १७ मंत्र्यांचा समावेश आहे. यापैकी आठ कॅबिनेट दर्जाचे मंत्री आहेत आणि तेवढेच राज्यमंत्री (एमओएस) आहेत. भाजपच्या सर्व आमदारांना दोन दिवस गांधीनगरमध्ये राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मंत्रिमंडळात समाविष्ट होण्याची अपेक्षा असलेल्या आमदारांना फोनवरून माहिती देण्यात आली आहे. दरम्यान, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा शुक्रवारी सकाळी गुजरातमध्ये पोहोचत आहेत.



## संपादकीय....

### हवामानात बदल

राज्यातील वातावरणात सातत्यानं बदल होत आहे. कुठे पाऊस तर कुठं उघडीप झाल्याचं चित्र दिसत आहे. आज देखील राज्याच्या काही भागात जोरदार पाऊस झाल्याचं चित्र पाहायला मिळालं. तापमानात किंचित वाढ होत असून अनेक भागांत ढगाळ वातावरणासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. १७ ऑक्टोबर रोजी कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा तसेच उत्तर महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह हलक्या पावसाची शक्यता आहे. तर विदर्भात मात्र कोरडे वातावरण राहण्याचा अंदाज आहे. मुंबईत कमाल तापमान ३६ अंश सेल्सिअस आणि किमान २६ अंश सेल्सिअस इतके राहण्याची शक्यता आहे. मुंबई, पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांत ढगांच्या गडगडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. त्यामुळं नागरिकांनी सावधानता बाळगावी असं आवाहन करण्यात आलं आहे. पुण्यातील कमाल तापमान ३३ अंश सेल्सिअस आणि किमान तापमान २० अंश सेल्सिअस इतके राहण्याची शक्यता आहे. पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली आणि सोलापूर या जिल्ह्यांत हलक्या पावसाची शक्यता आहे. तसेच घाटमाथा परिसरात देखील विजांच्या कडकडाटासह हलक्या पावसाची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे. मराठवाड्यातही उद्या पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये कमाल तापमान ३२ अंश सेल्सिअस आणि किमान तापमान २२ अंश सेल्सिअस इतके राहण्याचा अंदाज आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांत ढगांच्या गडगडाटासह हलक्या पावसाची शक्यता आहे. उत्तर महाराष्ट्रातील नाशिकमध्ये कमाल तापमान ३३ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २१ अंश सेल्सिअस इतके राहण्याचा अंदाज आहे. धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांत हलक्या पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. विदर्भातील नागपूरमध्ये कमाल तापमान ३३ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २३ अंश सेल्सिअस इतके राहण्याची शक्यता आहे. अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ या जिल्ह्यांत कोरडे वातावरण राहण्याची असल्याचं हवामान विभागानं सांगितलंय. राज्यातील काही भागांत पावसाचे सत्र सुरू राहण्याची चिन्हे आहेत. पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि मराठवाडा येथे विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असून विदर्भात कोरडे हवामान राहणार असल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे.

# गडचिरोलीची वाटचाल माओवाद समाप्तीकडे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## सर्वोच्च नेता भूपतीसह ६१ माओवाद्यांचे मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सशस्त्र आत्मसमर्पण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गडचिरोली : केंद्र व राज्य शासनाच्या प्रयत्नातून माओवादी केंद्रीय समितीच्या अनेक जहाल म्होरक्यांसह एकूण ६१ सदस्यांनी सशस्त्र आत्मसमर्पण केले आहे. ही माओवादाच्या समाप्तीची सुरुवात असून माओवाद पूर्णपणे हद्दपार होणार, अशा परिस्थितीत आज आपण पोहोचलो असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. या लढाईचे नेतृत्व गडचिरोली जिल्हा करत असून महाराष्ट्रासाठी हे अभिमानस्पद असल्याचाही उल्लेख त्यांनी केला.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत गडचिरोली येथे साडेपाच कोटींहून अधिकचे बक्षीस असलेल्या नक्षल चळवळीतील सर्वोच्च नेता भूपती उर्फ मल्लोजुल्ला वेणूगोपालराव याच्यासह माओवादी केंद्रीय समितीच्या दोन डिकेएसझेडसी सदस्य, १० डिव्हीसीएम दर्जाच्या वरिष्ठ कॅडरसह एकूण ६१ जहाल माओवादी सदस्यांनी सशस्त्र आत्मसमर्पण केले. त्यांनी ५४ अग्निशस्त्रांसह मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर आत्मसमर्पण केले. या सर्व आत्मसमर्पित माओवाद्यांचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते संविधानाची प्रत देऊन लोकशाहीच्या मुख्य प्रवाहात स्वागत करण्यात आले.

पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, राज्य गुप्त वार्ताचे आयुक्त शिरीष जैन, अप्पर पोलीस महासंचालक विशेष कृती डॉ. छेरिंग दोरजे, विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, जिल्हाधिकारी अविश्यंत पंडा, आमदार डॉ. मिलिंद नरोटे, पोलीस उपमहानिरीक्षक अंकित गोयल, जिल्हा पोलिस अधीक्षक श्री. निलोत्पल, केंद्रीय रिझर्व पोलीस दल उप महानिरीक्षक (परिचालन) अजय शर्मा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे आदी मान्यवर गडचिरोली पोलीस मुख्यालयातील पांडू आलाम सभागृहात उपस्थित होते.

ऐतिहासिक आत्मसमर्पण आणि नवीन इतिहास

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ४० वर्षांपूर्वी अहेरी, सिरोंचा या भागात नवीन दलम सुरू करून माओवाद पसरवणाऱ्या भूपतीसारख्या माओवादी नेत्याने आज ६१ साथीदारांसह सशस्त्र आत्मसमर्पण केले आहे. ही देशाच्या इतिहासातील अत्यंत मोठी घटना आहे. आजच्या आत्मसमर्पणातून नवीन इतिहास लिहिला गेला आहे. यापूर्वी उत्तर गडचिरोलीतून माओवाद संपुष्टात आणण्यात आला आहे, आणि आजच्या या आत्मसमर्पणामुळे दक्षिण गडचिरोलीतील माओवादही संपुष्टात आला आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी अन्य माओवाद्यांनाही आत्मसमर्पण करून मुख्य प्रवाहात येण्याचे आवाहन केले, अन्यथा परिणाम भोगावे लागतील असा इशाराही दिला.

समता केवळ संविधानातूनच

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, दंडकारण्याच्या या भागातील लोकांनी माओवादाशी लढा दिला. माओवादामुळे हा भाग विकासापासून वंचित राहिला. 'पिपल्स वॉर ग्रुप' द्वारे माओवादी सक्रिय झाले आणि त्यांनी येथील युवकांमध्ये व्यवस्थेविरुद्ध संभ्रम निर्माण केला. मात्र समता व न्याय फक्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानातूनच येऊ शकते या वास्तविकतेची जाणीव झाल्याने माओवादी चळवळीच्या नादी लागलेले आता आत्मसर्पण करत आहेत.

आत्मसमर्पणाचे धोरण आणि पुनर्वसनाची ग्वाही

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आत्मसमर्पण करणाऱ्यांना लोकशाहीच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्यशासन कटिबद्ध आहे. संविधानाचा आदर करेल, त्याच्या जीवनात सकारात्मक बदल होईल असा संदेश आम्ही आत्मसमर्पितांच्या पुनर्वसनातून देऊ, आत्मसमर्पण केलेल्यांचे योग्य पद्धतीने पुनर्वसन करण्यात येईल. यापूर्वी आत्मसमर्पण केलेल्यांना येथील उद्योगांमध्ये प्रशिक्षण देऊन नोकरी देण्यात आली असून, भविष्यातही रोजगार देऊन पुनर्वसन करण्यात येईल. सर्व आत्मसमर्पित माओवादी सदस्यांच्या पुनर्वसनासाठी एकत्रितपणे एकूण ३ कोटी १ लाख ५५ हजार रुपये देण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

केंद्र सरकारची रणनीती

मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून माओवादाविरुद्ध निश्चित करण्यात आलेल्या धोरणांचे आणि गृहमंत्री अमित शाह यांनी २०२६ पर्यंत माओवाद संपवण्यासाठी आखलेल्या रणनीतीचे कौतुक केले. या धोरणात आत्मसमर्पणातून मुख्य प्रवाहात सामील होणे किंवा पोलीस कारवाईला सामोरे जाणे हे दोनच पर्याय असल्यामुळे देशातून मोठ्या प्रमाणात माओवादाचे उच्चाटन होत असल्याचे त्यांनी सांगितले.

गडचिरोली पोलिसांचे अभिनंदन आणि पुरस्कार

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गडचिरोली पोलिसांनी सातत्याने माओवादविरूद्ध मोहिमा आखून माओवादाला जेरबंद व नेस्तनाबूत केले. विकासकामांच्या प्रभावी अंमलबजावणीद्वारे नवीन माओवाद्यांची भरती रोखली, या ऐतिहासिक कामगिरीबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी पोलीस दल आणि केंद्रीय राखीव दलाचे अभिनंदन करत गडचिरोली पोलीस दलाला १ कोटी रुपयांचा पुरस्कार जाहीर केला. तसेच सजग राहण्याचे आणि लोकांचा यंत्रणेवरील विश्वास अधिक दृढ करण्याचे आवाहन केले. गडचिरोलीत मोठ्या प्रमाणात औद्योगिक गुंतवणूक येत असून, हा जिल्हा 'स्टील मॅग्नेट' बनत आहे. गुंतवणूक करणाऱ्यांना ९० टक्के स्थानिकांना रोजगार देण्याच्या अटीवरच परवानगी दिली जात असून, १ लाख स्थानिकांना रोजगार देण्याचा मानस आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. गडचिरोलीत पायाभूत सुविधा उभारताना जल, जमीन, जंगल यांचा विनाश होऊ नये यासाठी ५ कोटी झाडे लावण्याचा संकल्प केला आहे. पुढील काळात गडचिरोलीला देशाचे ग्रीन स्टील हब तयार करण्यासाठी योजना आखल्या जात असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

जिल्हा पोलीस अधीक्षक निलोत्पल यांनी प्रास्ताविकात सांगितले की, २०२१ पासून आतापर्यंत १४० माओवाद्यांना अटक करण्यात आली, तर ८१ माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे, ९३ जहाल माओवाद्यांना कंठस्नान घालण्यात आले.

यावेळी नक्षल पीडित कुटुंबांना धनादेशांचे वितरणही करण्यात आले. अपर पोलीस अधीक्षक एम. रमेश यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## नंगपुरामुर्री निवासी शाळेत पालकसभा उत्साहात संपन्न पालकांचा उत्स्फूर्त सहभाग : महत्त्वाच्या चर्चा झाल्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया : तालुक्यातील नंगपुरामुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा याठिकाणी पालकसभा उत्साहात संपन्न झाली.




यावेळी मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षक नीता भलमे, पी. ए. लांजेवार, मुन्नाभाई नंदागवळी, साधना पारधी, आशिष शहारे, कार्तिक शहारे, दीक्षा तुरकर व तुषार महाजन आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

याप्रसंगी अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपुरामुर्री येथे साजरी झाली. वर्ग सहावी ते दहावीच्या यामध्ये ७० पुरुष व महिला पालक सहभागी झाले होते. पालकांनी आपले मत व्यक्त केले. शाळेतील शिक्षकांनी त्यांचे समाधान करण्यात आले. साधक बाधक चर्चा घडून आणल्या.

पालक सभेचे संचालन प्रदीप ढवळे यांनी केले. तर आभार मुन्नाभाई नंदागवळी यांनी मानले. यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक, कर्मचारी व सुरक्षारक्षक यांनी परिश्रण घेतले.

## प्रा.दशरथ कुदळे यांनी अनाथ मुलांसोबत केला वाढदिवस साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी : सध्या वाढदिवसाचे स्तोम फार मोठ्या प्रमाणात वाढले असुन वाढदिवस साजरा करताना फार मोठ्या प्रमाणात पैसा व अन्नाची नासाडी होताना दिसत आहे. परंतु विद्या प्रतिष्ठान इंदापूर महाविद्यालय येथे कार्यरत असलेल्या प्रा. दशरथ कुदळे यांनी वाढदिवसासाठी इतरत्र होणारा खर्च टाळून त्यांनी आपला वाढदिवस इंदापूर येथील श्रावण बाळ अनाथ आश्रम येथे साजरा केला. प्रा. कुदळे हे गेली दहा वर्षापासून श्रावणबाळ आश्रमातील अनाथ मुलांबरोबर आपला वाढदिवस साजरा करत असुन तेथील मुलांना खाऊवाटप व आवश्यक शैक्षणिक साहित्य हि वाढदिवसाच्या निमित्ताने करत आहेत.



सदर उपक्रमाविषयी प्रा. कुदळे यांनी सांगितले कि, वाढदिवसासाठी होणारा अनावश्यक खर्च टाळून अनाथ आश्रमातील मुलांसोबत वाढदिवस साजरा केला तर तेथील मुलांना एक छोटीशी मदत होते, याशिवाय यानिमित्ताने त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहण्याचे सुख हे इतर सर्व सुखापेक्षा श्रेष्ठ असुन आपण आपल्या समाजाचे काहीतरी देणे लागतो या भावनेतून येथुन पुढे आश्रमातील बारा विद्यार्थ्याच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च उचलण्याचा संकल्प या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांनी केला.

# सरदार @१५० एकता अभियानात युवकांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे : क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त केंद्र सरकारच्यावतीने 'सरदार१५० युनिटी मार्च' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाअंतर्गत राष्ट्रीय पदयात्रेचा शुभारंभ २६ नोव्हेंबर रोजी तर राज्यात या मोहिमेचा शुभारंभ ३१ ऑक्टोबर रोजी होणार आहे. या मोहिमेत राज्यातील जास्तीत-जास्त युवकांनी सहभागी होण्याचे आवाहन क्रीडा व युवक कल्याण मंत्री ड् माणिकराव कोकाटे यांनी मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत केले.

सरदार ऽ१५० एकता मोहिमेचा भव्य शुभारंभ

या मोहिमेअंतर्गत विकसित भारत पदयात्रा उपक्रमाद्वारे युवकांमध्ये देशभक्ती, एकता आणि नागरी जबाबदारी जाणीव, राष्ट्रीय अभिमानाची भावना दृढ करणे, नागरी सहभाग वाढविणे आणि युवकांमध्ये एकतेची व देशभक्तीची भावना रुजविण्यात येणार आहे. राष्ट्रीय स्तराबरोबरच राज्यातही सरदार१५० एकता मार्चचे आयोजन करण्यात येत आहे. लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त त्यांच्या राष्ट्रीय एकतेतील योगदानाचे स्मरण ठेवण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. याद्वारे भारताचा सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक उत्कर्ष साधणे व एकात्मता वाढवणे यावर भर असणार आहे. या मोहिमेत युवकांना सहभागी करून राष्ट्रनिर्माणात त्यांना सक्रियपणे सहभागी करणे, देशभक्ती आणि नागरी जबाबदारीची भावना जागविणे ही मुख्य प्रेरणा आहे. राज्यात जिल्हा स्तरावर पदयात्रा आयोजित करण्यात येणार आहे.

जिल्हा स्तरावरील पदयात्रा (३१ ऑक्टोबर – १५ नोव्हेंबर २०२५)

प्रत्येक जिल्ह्यात ३ दिवसांच्या कालावधीत ८ ते १० कि.मी. पदयात्रा आयोजित करण्यात येईल.



पदयात्रेदरम्यान सरदार पटेल यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून, आत्मनिर्भर भारताची शपथ घेण्यात येईल आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. महाराष्ट्रात सर्व जिल्ह्यामध्ये जिल्हा प्रशासन, क्रीडा विभाग, चध भारत, छडड, छउउ तसेच स्थानिक प्रशासन जिल्हास्तरीय पदयात्रा आयोजित करणार आहेत. क्रीडा विभाग या पदयात्रेच्या आयोजनाकहरता आयोजक म्हणून असणार आहे.

निबंध आणि वादविवाद स्पर्धा, सरदार पटेल यांच्या जीवनावर चर्चासत्रे आणि पथनाट्ये (नुक्कड नाटक)., नशा मुक्ती भारत प्रतिज्ञा, योग आणि आरोग्य शिबिरे,स्वच्छता मोहिमांचा समावेश, महिला कल्याण शिबीरे, योग आणि आरोग्य शिबीरे, वोकल फॉर लोकल किंवा स्वदेशी उत्पादनांना चालना देणारे अभियान गर्व से स्वदेशी प्रतिज्ञा,शाळा, महाविद्यालयांमध्ये निबंध, वादविवाद, परिसंवाद, पथनाट्ये, स्थानिक कलांवर आधारित कार्यक्रम-संगीत, नृत्य, लोकनृत्य इत्यादी, संस्था स्वदेशी मेळावे, आत्मनिर्भर भारत प्रतिज्ञा

या उपक्रमासाठी सर्व नोंदणी चध इहरीरीं झेंीरिश्र वर ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत आहे. हींीिं://ूल-हरीरीं.सेीं.ळप/रिसशी/ींपळीूंरीलह देशातील सर्व युवकांना या ऐतिहासिक आणि प्रेरणादायी सरदार१५० एकता मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

अधिक माहितीसाठी युवक व्यवहार आणि क्रीडा मंत्रालय भारत सरकार वेबसाईट: हींीिं://ूलहरीरीं.सेीं.ळप भेट द्यावी, असे आवाहन क्रीडा विभागामार्फत करण्यात आले आहे.

राज्य युवा धोरणासाठी युवकांनी सूचना ऑनलाईन पद्धतीने सादर कररण्याचे आवाहन

राज्यातील युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांच्या सहभागातून आधुनिक, सर्वसमावेशक तसेच सुधारित राज्य युवा धोरण साकारण्यात येत आहे. या अनुषंगाने १३ ते ३५ वयोगटातील युवक-युवतींकडून विविध विषयांवरील विचार, मते आणि सूचना ऑनलाइन पद्धतीने नोंदविण्याचे आवाहन क्रीडा व युवक कल्याण मंत्री ड. माणिकराव कोकाटे यांनी पत्रकार परिषदेत केले. हे युवा धोरण जागतिकीकरणाच्या गतीशी संतुलित राहून युवकांना वैज्ञानिक दृष्टिकोन, वैविध्यतेचे ज्ञान आणि नागरिक जबाबदाऱ्यांची जाणीव यासाठी सक्षम व्यासपीठ देईल. राज्याचे सुधारित युवा धोरण युवा धोरण अधिक प्रभावी करण्यासाठी युवकांना आपले विचार, मते आणि सूचना देण्याचे आवाहन, क्रीडा व युवक कल्याण मंत्री ड. माणिकराव कोकाटे यांनी केले.

क्रिडा व युवक कल्याण मंत्री ड.कोकाटे यांनी सांगितले की, सामाजिक, शैक्षणिक आणि कौशल्य विकासावरील सूचना या माध्यमातून मागविल्या जाणार आहेत. या धोरणात लिंग, धर्म, जात, भाषा, उत्पन्न, ग्रामीण-नागरी, अल्पसंख्यांक आणि मागासवर्गीय सर्व गटांचा विचार करण्यात येणार आहे, जेणेकरून कोणताही तरुण तरुणी वंचित राहणार नाही.

युवा धोरणाद्वारे तरुणांना निर्णय प्रक्रियेत सहभाग, शिक्षणाचा हक्क, रोजगार व उद्योजकता संधी, आरोग्य, पर्यावरण, निवारा, कला-क्रीडा आणि सांस्कृतिक सहभाग यांसारखे मूलभूत अधिकार दिले जाणार आहेत, असेही मंत्री ड. कोकाटे यांनी सांगितले.

हे धोरण समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. ग्रामीण तरुणांना व्यासपीठ मिळावे यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहेत,असेही ड कोकाटे यांनी सांगितले. महिला व बाल विकास, सांस्कृतिक कार्य, कौशल्य विकास इत्यादी विभागांच्या समन्वयातून नाविन्यपूर्ण युवा योजना सुरू केल्या जाणार आहेत. युवा धोरणात मानसिक आरोग्य, व्यसनमुक्ती, शिक्षण, रोजगार, कृत्रिम बुद्धिमत्ता (ख), सायबर सुरक्षा व डिजिटल तंत्रज्ञान यांसारख्या नव्या आव्हानांचाही समावेश असेल, असेही मंत्री क्रीडा ड. कोकाटे यांनी सांगितले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# कार्तिकी यात्रा: वारकरी, भाविकांच्या सोयी सुविधांबाबत योग्य नियोजन करावे : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद




## संबधित यंत्रणांनी सर्व कामे २७ ऑक्टोबर पर्यंत पुर्ण करावीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : कार्तिकी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून तसेच परराज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक येतात कार्तिकी शुध्द एकादशी रविवार दि. ०२ नोव्हेंबर, २०२५ रोजी असून, यात्रा कालावधी दि.२२ ऑक्टो. ते ०५ नोव्हें. असा आहे. या यात्रा कालावधीत वारकरी, भाविकांना आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी सर्व संबधित विभागांनी समन्वय साधून योग्य नियोजन करावे, तसेच सर्व कामे २७ ऑक्टोबर पर्यंत पुर्ण करावीत अशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्या.

कार्तिकी यात्रा नियोजनाबाबत केबीपी कॉलेज, महाविद्यालय येथील सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे, उपजिल्हाधिकारी संतोष देशमुख, प्रांताधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, कार्यकारी अभियंता अमित निमकर, नगरपालिका जिल्हा प्रशासन अधिकारी योगेश डोके, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एकनाथ बोधले यांच्यासह संबधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद म्हणाले, आषाढी यात्रा कालावधीत भाविकांना ज्याप्रमाणे आवश्यक सुविधा उपलब्ध केल्या होत्या त्याप्रमाणेच कार्तिकी यात्रा कालावधीतही सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. नगरपालिकेने शहरातील खड्डे तात्काळ बुजवावेत, सीसीसी टीव्ही यंत्रणा सुस्थितीत ठेवावी. मुबलक स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पाणी पुरवठा करावा, चंद्रभागा वाळवंटात अतिक्रमणे होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. धोकादायक इमारतींवर ठळक सूचना फलक लावावेत. आवश्यक ठिकाणी बॅरकेंटींग करावे अन्न व औषध प्रशासनाने खाद्यपदार्थांची तसेच प्रसादलयाच्या दुकानांची तपासणी करण्यासाठी जादा पथकाची नेमणूक करावी. शेगांव दुमाला ते जुना दगडीपुल येथे कोणत्याही स्टॉलला परवानगी देवू नये. जुना दगडी पुलाला बॅरेकेटींग करावे. बोटीत भाविकांसाठी लाईफ जॅकेटची व्यवस्था करावी. कार्तिकी यात्रा कालावधीत वाखरी येथे जनावरांचा बाजार मोठ्याप्रमाणात भरत असल्याने संबधित यंत्रणेने आवश्यक सुविधा उपलब्ध कराव्यात. तसेच बाहेरील राज्यातून येणाऱ्या जनावरांची चेक पोस्टवरच आरोग्य तपासणी करावी

मंदीर समितीने दर्शनरांगेत, दर्शनमंडपात भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात,दर्शन रांगेत घुसखोरी होऊ नये यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. फायर ऑडीट व इलेक्ट्रीक ऑडीट करुन घ्यावे

वाहतुक विभागाने शहरातील अंतर्गत प्रवासी वाहतुक करताना रिक्षा चालकांकडून जादा दराची आकारणी होणार नाही याची दक्षता घ्यावी. आरोग्य विभागाने मुबलक औषधांचा पुरवठा उपलब्ध ठेवावा. यात्रा कालावधीत तज्ञ डॉक्टरांची नेमणूक करावी. भक्ती सागर (६५ एकर) येथील प्लॉटचे वाटप सुरु करावे. तसेच भाविकांच्या सुरक्षेसाठी गॅस व इलेक्ट्रीक तपासणीसाठी पथकांची नेमणूक करावी, अशा सूचनाही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी यावेळी दिल्या.

यावेळी मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी कार्तिकी यात्रा कालावधीत भाविकांना जलद व सुखकर दर्शन व्हावे यासाठी मंदिर समितीकडून योग्य नियोजन करण्यात आले असून, पत्राशेड, दर्शन रांगेतील भाविकांना स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व आवश्यक सोई सुविधा उपलब्ध करण्यात आल्याचे सांगितले. त्याचबरोबर नगरपालिका प्रशासनाकडून भाविकांच्या आरोग्य सुविधेसाठी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची उपलब्धता. स्वच्छतेसाठी जादा हंगामी स्वच्छता कर्मचाऱ्यांची नेमणूक, नदी पात्रातील स्वच्छता, तात्पुरते शौचालय व्यवस्था, भक्ती सागर (६५ एकर) सर्व सुविधा भाविकांना उपलब्ध करण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी सांगितले.

# मानेगाव येथे भगीरथ योजनेतून ११ केव्हीए लाईनचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत आबा पाटील यांच्या प्रयत्नातून भगीरथ योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या ११ के.व्ही.ए. विजेच्या लाईनचे उद्घाटन आज माढा तालुक्यातील मानेगाव सबस्टेशन येथे आमदार अभिजीत पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

यावेळी आ. अभिजीत पाटील म्हणाले सांगितले की, माढा तालुक्यातील विजेचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. प्रत्येक डीपीवरील ऍडिशनल लाईनचे प्रस्ताव पाठवण्यात आले आहेत. भविष्यात कोणत्याही भागात विजेचा तुटवडा निर्माण होऊ नये, यासाठी आवश्यक त्या सर्व उपयोजना करण्यात येतील. माढा तालुक्यात पूरग्रस्त भागातील मदत ही आमची जबाबदारी आहे, जाहिरात नव्हे. आम्ही मदत म्हणून जे केले ते आमचे कर्तव्य समजून केले असून, या पुढेही जनतेच्या सेवेसाठी सतत तत्पर असल्याचे आमदार अभिजीत पाटील म्हणाले.

या कार्यक्रमाला जेष्ठ नेते विलास बप्पा देशमुख, बाळासाहेब ढवळे, रामकाका मस्के, सुरेश पाटील, प्रतापराव देशमुख, बाळासाहेब ढेकणे, सुवर्णाताई शिवपुरे, विनंतीताई कुलकर्णी, भाऊसाहेब महाडिक, निलेश बापू पाटील, दिनेश जगदाळे, ऋषिकेश तांबिले, महादेव साबळे, संजय पारडे, बप्पा शेळके, राहुल पारडे, मिटू मुकणे, बापू भोगे, विलास पारडे, आबासाहेब साठे, बाळासाहेब राऊत, संजय तांबिले, गणेश उमाटे तसेच मानेगाव ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उद्घाटन सोहळ्याच्या निमित्ताने मानेगाव व परिसरातील नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, या नव्या वीजपुरवठ्यामुळे ग्रामविकासाला नवीन चालना मिळणार आहे.

# कवळी ग्रामस्थांच्या वतिने शाळेला एलईडी टिव्ही भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव :कवळीच्या सरपंच राहिबाई लहु जगताप यांच्या हस्ते फीत कापुन स्क्रीन उद्घाटन संपन्न




औसा तालुक्यातील कवळी येथील जिल्हा परीषद शाळेच्या अभ्यासात व गुणवत्तेत वाढ व्हावी व विद्यार्थ्यांना एल ई डी टिव्ही वर ऑनलाईन शिक्षण घेता यावं यासाठी यासाठी शाळेच्या वतिने एल ई डी टिव्ही ची मागणी करण्यात आली अन कवळी ग्रामपंचायत व कवळी तरुण व ग्रामस्थांच्या वतिने लोकवर्गणी गोळा करुन विद्यार्थ्यासाठी एल इ डी शाळेला भेट देण्यात आली .व विद्यार्थ्यांच्या संकल्पनेतील दिपावली निमीत्त दिवे व आकाश कंदील लाउन दिपोत्सव साजरा करत . गावातील विकासाला प्राधान्य देत कवळीचा सर्वांगीण विकास करणार्या रणरागीणी सरपंच राहिबाई जगताप यांच्या शुभ हस्ते ऑनलाईन शिक्षणाचा शुभारंभ करण्यात आला.. यावेळी जिल्हा परीषदेचे मेह्त्रे, कृषी सहायक चौधरी, उमेद चे जाधव, समुदाय आरोग्य अधिकारी मळकोंडजीचे डॉ तनपुरे, मातोळा केंद्रप्रमुख शेख.ग्राम महसुल अधिकारी जाधव ,नरेगा विभागाचे बनसोडे मॅडम ,नरेगा विभागाचे काळे मॅडम, सरपंच राहीबाई लहू जगताप, उपसरपंच सुनिता महादेव जगताप सदस्य विनिया गोविंद शिंदे, स्वप्नाली विठ्ठल गायकवाड, सुशिलाबाई शेषराव माळी, निवृत्ती संभाजी भिसे, समाधान बाबुराव जगताप, शिवाजी लहू करंडे, ग्रामविकास अधिकारी एन टी रायफळे, जि.प.प्रा. शाळा, कवळी मुख्याध्यापक . पाटील ए.जी.सहशिक्षक गड्डवार एस.व्हि. श्रीमती.चितळे जे.व्हि. शाळा सहायक. पाटील पी.बी.सह कवळी ग्रामस्थ उपस्थीत होते.

# अंबरनाथ नाट्यगृहाला साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे नाव देण्याची मागणी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उल्हासनगर प्रतिनिधी /बाळासाहेब अहिरे : अंबरनाथ नगरपालिकेने अद्यावत नविन नाट्यगृह बांधले आहे, साहित्य रत्न अण्णा भाऊ साठे यांचे साहित्यातील बहुमुल्य योग्य दान त्यांच्या साहित्यातून अनेक मराठी चित्रपट व नाटक, पोवाडे, लोकगीते निर्माण झाली आहेत,

मुंबई महानगर प्रदेशातील अनेक सामाजिक कार्यकर्ते व संघटना, लहुजी सेना,वल्सा सामाजिक संस्था अनेक बहुजन समाजातील संघटना यांनी अंबरनाथ येथील नवीन नाट्यगृहला साहित्य रत्न अण्णा भाऊ साठे यांचे नाव देण्याची मागणी केली ,

दि १४ रोजी अमरधाम चौक खेमाणी उल्हासनगर कॅम्प २, संविधान चौकात या मागणीसाठी सर्व सामाजिक कार्यकर्ते व संघटना लहुजी सेना यांनी एकदिवसीय स्वाक्षरी मोहीम हाती घेतली होती, लहुजी सेना कल्याण जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर मरसाळे,अतिष थोरात, अंकूश पवार,वल्सा सामाजिक संस्था अध्यक्ष संतोष खेत्रे, प्रा प्रविण माळवे, मनोज जगताप,गजानन बामणकर इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते..

# रिपाइं (आठवले) चे तानाजी कदम यांच्या वाढदिवसानिमित्त तुळजापूर येथे अभिष्टचिंतन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



वागदरी /एस.के. गायकवाड : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले मराठवाडा विभाग उपाध्यक्ष तानाजी कदम यांच्या वाढदिवसानिमित्ताने तुळजापूर येथील शासकीय विश्रामग्रहात अभिष्टचिंतनाचा कार्यक्रम संपन्न झाला. प्रारंभी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून उपस्थित सर्व कार्यकर्त्यांनी अभिवादन करून रिपाइं(आठवले) पक्षाचे मराठवाडा विभाग उपाध्यक्ष तानाजी कदम यांचा यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांचा भरभरून येथोचित सत्कार केला.या प्रसंगी अनेक कार्यकर्त्यांनी वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या.

तानाजी कदम यानी आंबेडकरी चळवळीचे केंद्र असलेल्या तुळजापूर शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याच्या ठिकाणी त्यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी फार मोठे योगदान दिले आहे. दलित पँथर ते रिपब्लिकन पक्ष असा एकनिष्ठ तब्बल ४० वर्षाचा प्रवास अध्याप अविरत पणे चालूच आहे.दाम्यानच्या काळात रिपब्लिकन चळवळीच्या माध्यमातून गोरगरीब सामान्य जनतेच्या आणि समाजाच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर अनेक वेळा मोर्चे आंदोलने करून सामाजिक न्याय देण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. बहुजनातील अनेक गोरगरीब जनतेला वैयक्तिक लाभाच्या शासकीय योजना त्यांनी मिळवून दिलेल्या आहेत. दलित पँथर ते रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया असा नामदार रामदास आठवले साहेबांच्या नेतृत्वाखाली आज तागायत एकनिष्ठ असलेले सामाजिक जाणीवेचे कार्यकर्ते म्हणून त्यांची जन माणसात ओळख आहे. त्यांच्या सुविध पत्नि र वैशाली ह्या तुळजापूर नगर परिषदेच्या माजी सदस्या म्हणून आपल्या पतिबरोबर सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. तानाजी कदम यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजि कार्यकमास रिपाइंचे तुळजापूर शहराध्यक्ष अरुण कदम, रोजगार आघाडीचे तालूका अध्यक्ष आप्पा कदम, प्रा. अशोक कांबळे,युवा आघाडीचे विष्णू सोनवणे सह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महिला बचत गटांना स्वावलंबनाकडे प्रोत्साहन देण्याचा उद्देश

# महिला बचत गटांच्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्री





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज :बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच सहाय्यक आयुक्त, एन विभाग यांच्या वतीने महिला व बाल कल्याण योजना तसेच राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत बचत गटांमार्फत उत्पादित वस्तूंचे प्रदर्शन व विक्री मेळावा घाटकोपर पूर्व येथे आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा गुरुवार, दिनांक १६ ऑक्टोबर ते शुक्रवार, दिनांक १७ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सकाळी १०.०० ते रात्री ८.०० वाजेपर्यंत खुला राहणार आहे. या उपक्रमाचे आयोजन निलयोग स्केअर मॉलसमोर, घाटकोपर (पूर्व) येथे करण्यात आले आहे.

प्रदर्शनामध्ये बचत गटांनी तयार केलेल्या विविध आकर्षक वस्तूंचा समावेश आहे. त्यात कापडी पिशव्या, हॅण्डमेड ज्वेलरी, दिवे, पणत्या, कंदिल, मेणबत्त्या, मेकअप पाऊच, तोरण, कपडे, सोलापुरी चादरी, लेदर प्रॉडक्टस्, ग्रीटिंग कार्डस्, कोकण मेवा, दिवाळी फराळ, मुखवास, चॉकलेटस्, खाद्य पदार्थ, सॅनिटरी पॅड्स, आर्टिफिशियल फ्लॉवर्स अशा अनेक वस्तूंचा समावेश आहे.

या प्रदर्शनाचा उद्देश महिला बचत गटांना स्वावलंबनाकडे प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे असल्याचे समाज विकास अधिकारी साधना खाडे यांनी सांगितले. उपायुक्त संतोषकुमार धोंडे आणि सहायक आयुक्त गजानन बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या महिला बचत गट केंद्राचे उद्घाटन एन वार्डच्या तक्रार निवारण अधिकारी वैशाली निकुंभ यांच्या हस्ते करण्यात आले.

# सरकारी नोकरी लावण्याचे आमिष देऊन आठ लाखाची फसवणूक केल्या प्रकरणी एकाचा जामीन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : हकीकत -आरोपी रितेश गौतम शिंदे वय २३, राहणार ओम गर्जना चौक विजापूर रोड सोलापूर यांनी आपल्या कॉलेज मधील मित्र अमर श्रीकांत अंटद यास माझे वडील नायब तहसीलदार आहेत त्यांचे मोठे अधिकाऱ्यांशी भरपूर ओळख आहेत तुला सार्वजनिक बांधकाम विभागात वरिष्ठ अभियंता या पदावर नोकरी लावतील असे आमिष दाखवून तू तुज्या वडिलांना घेऊन माझ्या वडील गौतम शिंदे यांना भेट असे सांगितल्याने यातील फिर्यादी श्रीकांत आबा अंटद व अमर हे भेटले त्यावेळी आरोपी गौतम शिंदे यांनी नोकरी लावण्याची हमी, खात्री दिली पण त्यासाठी आठ लाख (८००,०००) लागतील पहिला सहा लाख रुपये द्यावे लागेल, नंतर नोकरीचे ऑर्डर आल्या नंतर दोन लाख द्यायचे ठरले त्याप्रमाणे दिनांक २२/७/२०२४ रोजी बँक ऑफ बडोदा चे सहा लाख चे चेक दिला व त्या नंतर महिना होऊन गेला तरी नोकरीचे ऑर्डर नं आल्याने विचारणा केली असता उर्वरित दोन लाख दिल्या नंतर ऑर्डर निघेल असे सांगितल्याने अटक आरोपी रितेश शिंदे कडे दोन लाख दिल्यावरही नोकरी लावली नाही व विचारण्यास केले असता अटक आरोपी रितेश शिंदे, गौतम शिंदे, सरोजा शिंदे यांनी शिवीगाळ करून उलट तुमच्या वर केस करेन अशी धमकी दिले.

सदर प्रकरणी फिर्यादी श्रीकांत आबा अंटद रा,सिद्धेश्वर कारखाना कॉलनी होटगी रोड सोलापूर, यांनी विजापूर नाका पोलीस स्टेशन ला फसवणूक झाल्या बाबत आरोपी गौतम शिंदे, रितेश शिंदे, सरोजा शिंदे याच्या विरुद्ध बी येन एस कलम ३१८(४),३५२,३५१,३(५) अन्वये फिर्याद दाखल केली होती.

सदर प्रकरणी आरोपी रितेश शिंदे यास अटक झाली होती.

आरोपी रितेश शिंदे याचे जामीन अर्ज ऍड राजेंद्र फताटे याचे मार्फत केला होता सदर अर्जाचे सुनावणी होऊन आरोपी रितेश शिंदे याची न्याय मूर्ती दीपक कणखरे यांनी दीड लाख ची जातमुचाक्या वर जामीन वर मुक्तता केली.

यात आरोपी रितेश शिंदे तर्फे ऍड राजेंद्र फताटे यांनी तर सरकार तर्फे प्रियंवदा मांजरे यांनी काम पहिले.

# पुणे विभागात पात्र मतदारांची १०० टक्के मतदार नोंदणी करा

## अपर आयुक्त तुषार ठोंबरे यांचे आयोजित प्रशिक्षण सत्रात निर्देश; ६ नोव्हेंबरपर्यंत करता येणार मतदार नोंदणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : पुणे विभागातील पाच जिल्ह्यांमध्ये पदवीधर आणि शिक्षक मतदार संघांच्या मतदार यादी नव्याने तयार करण्याचा कार्यक्रम ाअंतर्गत ६ नोव्हेंबरपर्यंत मतदार नोंदणी करता येणार आहे, त्यामुळे विभागातील माध्यमिक शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, विद्यापीठ तसेच शासकीय कार्यालयातील पात्र मतदारांचे मतदार यादीमध्ये नाव नोंदविण्याची कार्यवाही येत्या ६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करावी, असे निर्देश अपर आयुक्त तुषार ठोंबरे यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात पुणे विभागातील पदवीधर व शिक्षक मतदार नोंदणीच्या अनुषंगाने पुणे विभागस्तरीय शिक्षण, उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण, कृषी विभागातील अधिकारी, विद्यापीठांचे कुलसचिव, महाविद्यालयीन प्राचार्य, म ाध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांकरिता आयोजित प्रशिक्षण सत्रात ते बोलत होते.

यावेळी महाराष्ट्र राज्य कृषी शिक्षण परिषदेच्या महासंचालक वर्षा उंटवाल लड्डा, पुणे उपजिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी मीनल कळसकर, उच्च म ाध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर, उच्च शिक्षण संचालक डॉ. अशोक उबाळे, तंत्र शिक्षण सहसंचालक डॉ. डी. व्ही. जाधव, शिक्षण उपसंचालक गणपत मोरे, अमरजीत पाटील, बाबुराव जाधव, पुणे महानगरपालिकेच्या म ाध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी आशा उबाळे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी संगीता बांगर, विविध शैक्षणिक संस्था, विद्यापीठांचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते. बैठकीस सातारा, सोलापूर, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, सहायक मतदार नोंदणी अधिकारी, पदनिर्देशित अधिकारी आणि अतिरिक्त पदनिर्देशित अधिकारी, शैक्षणिक संस्थेचे प्रतिनिधी दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

श्री. ठोंबरे म्हणाले, पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदार संघासाठी १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित नव्याने मतदार याद्या (डी - नोव्हो) तयार करण्याच्या कार्यक्रमांतर्गत मतदार नोंदणी सुरू आहे. सन २०२६ मध्ये पुणे विभागात पुणे, कोल्हापूर, सोलापूर, सांगली आणि सातारा या जिल्ह्यात होणाऱ्या पदवीधर व शिक्षक मतदार संघाकरिता निवडणुकीसाठी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार हे मतदार नोंदणी अधिकारी म्हणून नियुक्त असून, संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी हे सहायक मतदार नोंदणी अधिकारी आहेत. तसेच प्रत्येक विधानसभा मतदारसंघांचे म तदार नोंदणी अधिकारी हे त्यांच्या कार्यक्षेत्रापुरते मतदार नोंदणीचे काम करीत आहेत.



सन २०२६ मध्ये होणाऱ्या पदवीधर व शिक्षक मतदार संघाकरिता निवडणुकीसाठी नव्याने मतदार यादी तयार करण्याचे काम सुरु आहे. या कार्यक्रमाअंतर्गत यापूर्वीच्या पदवीधर किंवा शिक्षक मतदारसंघाच्या मतदारयादीत नाव समाविष्ठ असले तरी आता पात्र मतदारांचे नव्याने मतदार यादीत नाव समाविष्ट करावे, असे भारत निवडणूक आयोगाचे निर्देश आहेत. मतदार नोंदणी करताना सर्व कागदपत्रांची तपासणी करुनच नोंदणी करावी. नवीन मतदार नोंदणीचे अर्ज मतदार नोंदणी केंद्रावर पुरेशा प्रमाणात उपलब्ध राहील, याबाबत दक्षता घ्यावी. मतदारांना मतदार नोंदणी करण्याबाबत आवश्यक ते मार्गदर्शन करावे. मतदार नोंदणीकरिता एक गठ्ठा पद्धतीने अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, याबाबत नोंद घ्यावी.

पुणे विभागात मतदार नोंदणी कार्यक्रमाबाबत पदवीधर आणि शिक्षकांना माहिती होण्याकरिता व्यापक स्वरुपात जनजागृती करावी. शासकीय कार्यालयातील सर्व पदवीधर अधिकारी व कर्मचाऱ्यांची नोंदणी सर्वांनी सक्रीय सहभाग घ्यावा. शिक्षण म तदारसंघाकरिता शैक्षणिक संस्थेतील केवळ शिक्षकांचे मतदार यादीमध्ये नाव नोंदविण्यात आल्याची खात्री करुन घ्यावी, शिक्षकेतर कर्मचारी, शिपाई यांचे नाव नोंद करु नये. म तदार नोंदणीबाबत आपल्याला शंका असल्यास पदनिर्देशित अधिकारी, सहायक मतदार नोंदणी अधिकारी, उप जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

मतदार नोंदणी प्रक्रिया १ जानेवारी पासून निरंतर सुरु राहणार असून याम ध्येही मतदार नोंदणी करता येणार आहे. एकही पात्र मतदार नोंदणीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, असेही श्री. ठोंबरे म्हणाले.

प्रशिक्षण सत्रात मतदार नोंदणीचे टप्पे, मतदार नोंदणीचे अर्ज भरताना घ्यावयाची काळजी, अर्जाची छाननी प्रक्रिया, मतदार अर्हता, शैक्षणिक कागदपत्रे, मतदार नोंदणी जनजागृती कार्यक्रम, संदर्भ परिपत्रके, शासन निर्णय, आदेश आदी बाबत मार्गदर्शन करण्यात आले.

डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, विभागीय आयुक्त तथा मतदार नोंदणी अधिकारी, पुणे विभाग पदवीधर व शिक्षक म तदार संघ: मतदार नोंदणीची प्रक्रिया पार पाडताना प्रशासन, सर्व संबंधित यंत्रणा तसेच विद्यापीठे, शैक्षणिक संस्था आदींनी समन्वय साधून काम करावे. लोकशाही बळकटीकरणाकरिता विभागातील अधिकाधिक पात्र पदवीधर आणि शिक्षकांनी मतदार नोंदणी कार्यक्रमात सक्रीयपणे सहभागी होवून आपले नाव मतदार यादीमध्ये नोंदवून घ्यावा.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्र त्वरित सुरु करावेत

## शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांची मागणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर प्रतिनिधी/अमर जाधव : सोयाबीनला ५४०० रूपये हमीभाव असताना बाजारात मात्र ३५०० ते ४००० रुपये दराने खरेदी केली जात आहे ही शेतकर्यांची फसवणूकच असून हम ीभावापेक्षा कमी भावाने खरेदी करणार्यावर कठोर कारवाई करावी नाहीतर सरकारने त्वरित हमीभावाने शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी करावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती तथा जिल्हाप्रमुख संतोष भाऊ सोमवंशी यांनी केली आहे

लातूर जिल्ह्यातील ४ लाख हेक्टरवरील खरीपाची पिके अतिवृष्टी व महापुरामुळे वाहून गेली आहेत. काही शेतकर्यांच्या जमिनी खरडून गेल्याने शेतकर्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. तर काही शेतकर्यांच्या विहीरी मातीने बुजून गेल्या आहेत. त्याम ुळे काही प्रमाणात आलेले सोयाबीनचे पिक बाजारामध्ये विक्रीसाठी आले असताना त्या पिकाला ३५०० ते ४००० पर्यंत भावाने खरेदी केली जात आहे. शासनाने ५४०० रूपये हमीभाव जाहीर करूनही नाफेडकडून सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्र सुरू केले नसल्यामुळे शेतकर्यांना कमी भावामध्ये आपल्या म ालाची विक्री करावी लागत आसल्यामुळे शेतकर्यांची आर्थिक लूट होत आहे . त्यामुळे शासनाने अतिवृष्टी व महापुराच्या संकटातून उभारणार्या शेतकर्यांच्या हितासाठी त्वरित सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्र सुरू करून शेतकर्यांना न्याय द्यावा, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांनी राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांच्याकडे केली आहे.

# विद्यार्थ्यांनी बनवलेले आकाशकंदिल दिवाळी उजळवणारे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनीधी/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांदुळवाडी शाळेच्या विद्यार्थ्यांनी आज शाळेत कार्यानुभव तासिकेत नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत दिवाळीच्या सणाला उपयोगी पडेल असे आकाशकंदिल बनवले.इयत्ता पहिली ते सातवीच्या सर्व विद्यार्थ्यांनी या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद देत निरनिराळ्या रंगसंगतीचे आणि आकाराचे आकाशकंदिल शाळेतील शिक्षकांच्या मदतीने बनविले.उद्या शुक्रवार दि. १७ हा या शैक्षणिक वर्षातील या सत्रातील शेवटचा कार्यदिन असुन या दिवशीच सर्व विद्यार्थ्यांना दिवाळीच्या सणानिमित्त गुलाबजामुन च्या भोजनासह सत्र निकाल वाटप करण्यात येणार असल्याचे मुख्याध्यापक श्री संतोष भोजने यांनी सांगितले. शाळेतील सहशिक्षिका श्रीमती आशा पवार, श्रीमती रसिका आगरकर युवा प्रशिक्षणार्थी श्रीमती सुजाता कदम, सहशिक्षक श्री संतोष मोहिते,सयाजी शिंदे व मुख्याध्यापक श्री संतोष भोजने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# बार्टी संस्थेमार्फत यु.पी.एस.सी. भारतीय अभियांत्रिकी सेवा मुलाखत परीक्षा २०२५ साठी आर्थिक सहाय्य योजना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनिधी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) मार्फत यु.पी.एस.सी. भारतीय अभियांत्रिकी मुलाखत परीक्षा (UPSC Engineering - Personality Test Examination) या परीक्षेस पात्र असलेल्या महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांना मुलाखत परीक्षेच्या तयारीसाठी प्रती विद्यार्थी रक्कम रु. २५,०००/- आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.

दि. ०४ सप्टेंबर २०२५ रोजी संघ लोकसेवा आयोगाने भारतीय अभियांत्रिकी मुख्य परीक्षेचा निकाल घोषित केला आहे. सदर निकालानुसार भारतीय अभियांत्रिकी सेवा (Personality Test Examination) पात्र असलेल्या उमेदवारांना एकरकमी रक्कम रु. २५,०००/- चे आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. त्याबाबत सविस्तर जाहिरात व ऑनलाईन फॉर्म बार्टी संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन बार्टी संस्थेमार्फत करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी http://barti.maharashtra.gov.in NOTICE BORD UPSC Indian Engineering Service - Personality Test Examination 2025 Financial assistance Scheme येथे भेट द्यावी.

# फौजदार परीक्षेत प्रथम आलेल्या सुरज मेंढे यांचा बार्टीत सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनिधी : डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संचलित येरवडा, संकुल पुणे येथील निवासी स्पर्धा प्रशिक्षण केंद्रातील विद्यार्थी स्वप्निल सुरेंद्र मेढे यांनी २०२३ च्या राज्यसेवा पूर्व परीक्षा ( चझडउ) च्या फौजदार या परीक्षेत संपूर्ण राज्यात अनुसूचित जाती प्रवर्गातुन प्रथम क्रमांक पटकवल्याबद्दल नुकताच त्यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन प्रशिक्षण संस्था बार्टीच्यावतीने सत्कार करण्यात आला.

गट ब पोलीस उपनिरीक्षक या परीक्षेचा नुकताच निकाल घोषित झाला या पदावर बार्टीअंतर्गत प्रशिक्षण घेत असलेले सुरेंद्र मेंढे यांची पोलीस उपनिरीक्षक पदावर निवड झाली असुन त्यांनी दिनांक १४ आक्टोबर २०२५ रोजी बार्टी संस्थेला भेट दिली.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस त्यांनी विनम्र अभिवादन केले.

राज्य सेवा पूर्व परीक्षेत उत्तीर्ण होऊन बार्टीचा नावलौकिक केल्याबद्दल श्री स्वप्निल मेंढेढ यांचा विस्तार व सेवा विभागाचे विभागप्रमुख डॉ बबन जोगदंड, कौशल्य व विकास विभागाचे विभागप्रमुख अनिल कांरडे, लेखाधिकारी नितिन चव्हाण यांच्या हस्ते भारतीय राज्यघटनेची प्रत भेट देऊन सन्मानित करण्यात आले. आणि पुढील प्रशासकीय सेवेसाठी शुभेच्छा दिल्या.

माझ्या यशाचे श्रेय हे बार्टीचे असल्याचे सांगुन बार्टीमुळे मी आज अधिकारी झा झालो अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श समोर ठेवून काम करणार असल्याचे मेढे यांनी सांगितले.

याप्रसंगी प्रकल्प व्यवस्थापक डॉ सारिका थोरात, शुभांगी सुतार, विनायक भालेराव, महंमद कलाल , सुनंदा गायकवाड, उषा भिंगारे, वैशाली खांडेकर, रामदास लोखंडे यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# आरोग्य संस्थांमध्ये यांत्रिक पद्धतीने वस्त्र धुलाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यातील ५९३ शासकीय रुग्णालयांमध्ये स्वच्छता, सुरक्षितता आणि निर्जंतुक सेवा अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते आरोग्य भवन येथे यांत्रिक पद्धतीने वस्त्र धुलाई सेवेचा शुभारंभ करण्यात आला.



या उपक्रमामुळे राज्यातील २० जिल्हा रुग्णालये, आठ साम ान्य रुग्णालये, १०५ उपजिल्हा रुग्णालये, ३७८ ग्रामीण रुग्णालये, २२ महिला रुग्णालये आणि ६० ट्रॉमा केअर युनिट्स अशा राज्यातील एकूण ५९३ आरोग्य संस्थांमध्ये यांत्रिक पद्धतीने वस्त्र धुलाई सेवेद्वारे रुग्णसेवेची गुणवत्ता उंचावली जाणार आहे. या सर्व संस्थांमध्ये २९,३१५ खाटांची क्षमता आहे.

यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले की, राज्यात आरोग्य सेवांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात येत असून आता यांत्रिकी वस्त्र धुलाई सेवेच्या शुभारंभामुळे रुग्णालयांमधील स्वच्छता, शिस्त आणि रुग्णसेवेचा दर्जा आणखी उंचावेल. महाराष्ट्रात सुरू झालेली यांत्रिक वस्त्र धुलाई सेवा देशासाठी पथदर्शी ठरेल.

या प्रकल्पांतर्गत सरकारी आरोग्य संस्थांतील बेडशीट, उशांचे कव्हर, ब्लँकेट, रुग्णांचे आणि कर्मचाऱ्यांचे गणवेश, पडदे, टॉवेल आदी वस्त्रांची निर्जंतुक धुलाई पूर्णतः यांत्रिक पद्धतीने केली जाणार आहे. बॅरिअर वॉशिंग टेक्नॉलॉजीचा वापर करून मानवी हस्तक्षेपाशिवाय कपडे धुतले जातील. त्यामुळे प्रत्येक रुग्णालयाला संक्रमणमुक्त आणि स्वच्छ लिनन उपलब्ध होईल. सेवेच्या सुसूत्रता आणि कार्यक्षमतेसाठी दर आठवड्याच्या प्रत्येक दिवशी वेगवेगळ्या रंगांच्या बेडशीट्स वापरण्याची प्रणाली लागू करण्यात आली आहे. यात सोमवार व गुरुवार पांढरा, मंगळवार आणि शुक्रवार हिरवा तसेच बुधवार आणि शनिवार गुलाबी रंगाच्या बेडशिट्स रुग्णालयात वापरण्यात येणार आहेत.

या प्रकल्पाची अंमलबजावणी बाह्य खासगी संस्थेमार्फत करण्यात येत असून, संपूर्ण राज्यातील लिनन गोळा करणे, प्रतवारी करणे, निर्जंतुकीकरण करणे व वितरण करणे ही सर्व कामे मानवी हस्तक्षेपाशिवाय यांत्रिक पद्धतीने केली जाणार आहेत. या सेवेच्या म ाध्यमातून रुग्णांना स्वच्छ, निर्जंतुक आणि सुरक्षित लिनन उपलब्ध होणार असून, संक्रमणजन्य आजारांचा धोका मोठ्या प्रमाणावर कमी होणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

या उपक्रमाच्या शुभारंभप्रसंगी आरोग्य सेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे तसेच आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते तर दूरदृश्य प्रणालीद्वारे सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे- बोर्डीकर, आरोग्य सचिव वीरेंद्रसिंह तसेच राज्यातील जिल्हा व उपजिल्हा, इतर आरोग्य संस्थेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## आंतरमहाविद्यालयीन कुस्ती स्पर्धेचे पारितोषिक वितरण

## माजी आमदार मधुकराव चव्हाण यांचे प्रतिपादन

# शासनाने कुस्तीपटूंना सन्मानाने जगता येईल यासाठी ठोस उपाययोजना करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड): सद्यस्थितीत मैदानी खेळाकडे दुर्लक्ष होत असून शासनाने कुस्ती पट्टूंना सन्मानाने जगता येईल यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करणे आवश्यक आहे असे मत माजी आमदार मधुकराव चव्हाण यांनी आज येथील महाविद्यालयात संपन्न झालेल्या आंतरमहाविद्यालयीन कुस्ती स्पर्धेच्या पारितोषिक वितरण प्रसंगी व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म राठवाडा विद्यापीठाच्या वतीने व येथील बालाघाट महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात ११ ऑक्टोबर ते १३ ऑक्टोबर दरम्यान आंतरमहाविद्यालयीन कुस्ती स्पर्धा संपन्न झाल्या. सदर कुस्ती स्पर्धेच्या अंतिम दिवशी विविध वजन गटातुन विजयी झालेल्या मल्लांना माजी आमदार मधुकराव चव्हाण यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बालाघाट शिक्षण संस्थेचे सहसचिव तथा माजी नगराध्यक्ष शहाबाज काझी तर प्रमुख उपस्थिती बालाघाट शिक्षण संस्थेचे सहसचिव लिबराज कोरेकर, संचालक तथा माजी जिल्हा परिषद सदस्य बाबुराव चव्हाण, कॅप्टन बागल, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष राठोड यांची होती.

२२ मल्लांनी आपापल्या कसरती व डावपेचांचा प्रदर्शन करीत प्रेक्षकांची मने जिंकली.तर ५७, ६१, ६५, ७०,७४,७८, ८६, ९२,९७,१२५किलो वजनातून एकंदरीत २० मल्लांनी सुवर्ण व रौप्य पदक जिंकले. या यशस्वी मल्लांना मान्यवरांच्या हस्ते पदक व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

सुवर्ण पदक मिळवण्याऱ्यापैकी दिगंबर पाटील, प्रांजल भरेतीया, शनिराज निंबाळकर, विपुल थोरात, आयेशान शेख, साहिल सय्यद, संदीप लटके, आदित्य कांबळे, अमोल दिंडे, रोहन पवार तर रौप्य पदक मिळविणाऱ्यात कृष्णा रक्ते, कौशिक शेख, युवराज वाघ, मनोहर मुंडे, मारूती शिंदे, जय जाधव, दयानंद घोगरे, संभाजी देवकर, उदयसिंह खांडेकर, विकास तावरे या मल्लांचा समावेश आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. सुभाष राठोड, सुत्रसंचलन डॉ. संतोष पवार तर आभार प्रा. डॉ. कपील सोनटक्के यांनी मानले.

यावेळी शहाबाज काझी व बाबुराव चव्हाण यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या म हाविद्यालयातील मल्ल रोहन पवार यांनी १२५ वजन गटातुन सुवर्ण पदक मिळविल्याने माजी आमदार मधुकराव चव्हाण यांच्या हस्ते रोख अकरा हजार रुपयांचे बक्षीस देऊन गौरव करण्यात आले.

या स्पर्धेत पंच म्हणुन प्रा.धनराज भुजबळ, प्रा.डॉ. मंगेश डोंगरे, प्रा. राम विधाते, प्रा. हरि मस्के, प्रा. बालाजी भूरंगे, प्रा. सोमनाथ काबीले, प्रा. विजयसिंह बारवाल यांनी काम पाहिले.



यावेळी क्रीडा शिक्षक प्रा. डॉ. कपील सोनटक्के, कार्यालयीन अधिक्षक धनंजय पाटील, प्रा. डॉ अशोक कदम, डॉ. निलेश शेरे, प्रा. मोतीराम पवार, डॉ. शिवाजी घोडके, प्रा. डॉ. हंसराज जाधव, प्रा. सुजीत कटारे, प्रा. परवेझ पिरजादे, मैनोद्दीन शेख, माजी नगरसेवक सुधीर हजारे, अझहर जहागिरदार, अख्तर काझी, शिवाजी वऱ्हाडे, अणदूरचे माजी सरपंच धनराज मुळे, अप्पू घुमरे, भास्कर सुरवसे, सुरेश गायकवाड, शरद बागल, मानीक राठोड, सिद्धू सुतार, यांच्यासह नळदुर्ग शहरातील व परिसरातील कुस्तीचे जाणकार, गावातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म राठवाडा विद्यापीठ अंतर्गत असलेल्या जालना, बीड, धाराशिव व श्री छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ७१ महाविद्यालयातील कुस्ती पट्टूंनी सहभाग नोंदविला.